उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयामधील स्वलेखन कौशल्याचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. विद्यावाचस्पती नोंदणी पूर्ततेसाठी सादर करण्यात येणा-या संशोधन प्रबंधाचा प्रारूप आराखडा

SYNOPSIS

संशोधक

संतोष राजेश्वरराव सेलूकर

एम.ए.(इंग्रजी,शिक्षणशास्त्र,शैक्षणिक संप्रेषण) बी.एड. SET,D.S.M.

मार्गदर्शक

श्री मोरे व्ही.पी.

प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय कळमनुरी

ता. कळमनुरी जि. हिंगोली

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

2017-2018

प्रतिज्ञापत्र

मी संतोष राजेश्वरराव सेलूकर उद्‌घोषीत करतो की स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड विद्यावाचस्पती Ph. D. शिक्षणक्रमाच्या नोंदणीसाठी संशोधन प्रबंधाचा आराखडा SYNOPSIS सादर उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयामधील स्व-लेखन कौशल्याचा अभ्यास

हा विषय संशोधनासाठी निवडला असून संशोधकाने स्वत: श्री डॉ.मोरे व्ही.पी.प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय कळमनुरी जिल्हा हिंगोली यांच्या मार्गदर्शनाखाली स्वत: परिश्रमपूर्वक पुर्ण करण्याचे ठरवले असून.यापूर्वी कोणत्याही पदवी,पदविका,पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या पूर्ततेसाठी कोणत्याही संस्थेत अथवा विद्यापीठात प्रस्तुत विषयावर प्रबंध सादर केलेला नाही.असे प्रतिज्ञापूर्वक घोषीत करतो.या संशोधनासाठी उपयोगात आणावयाचे संदर्भग्रंथ योग्य विविध लेख व व्यक्तिनामसूची या सर्वाचा योग्य निर्देश प्रस्तुत अहवालात करण्यात येईल.

संशोधक

संतोष राजेश्वरराव सेलूकर

विद्यावाचस्पती ,शिक्षणक्रम

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड

1.1)प्रस्तावना :-

भाषा ही मानवाला लाभलेले फार मोठे वरदान आहे.मानवाने जी प्रगती केलेली आहे ती सर्व भाषेमुळेच झालेली आहे.तसेच भाषा ही मानवाच्या विकासात अत्यंत महत्त्वाची असते.आपल्या भावना विचार अभिव्यक्ती आपण सर्व भाषेव्दारेच व्यक्त करू शकतो.भाषेमुळे विचारशक्ती विकसित होते तसेच जीवनदृष्टी ही बदलते.शाळा स्तरावर विद्यार्थ्यांना लेखन करायला शिकविले जाते.ते लेखन केवळ श्रुत लेखन किंवा अनुलेखन या प्रकारचे लेखन असते परंतु कल्पना करून स्वत: काही तरी नाविण्यापूर्ण लेखन करणे म्हणजे सृजनात्मक लेखन होय.प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सराव हा केवळ अनुलेखन आणि श्रुतलेखन या बाबत अधिक केला जातो. परंतु सृजनात्मक लेखन हे कौशल्य व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत आवश्यक असे कौशल्य आहे.त्यामध्ये कथा,कविता,निबंध लेखन इत्यादी भाग येतो.लहान मुले अत्यंत निरागस असतात आणि ते खूप चांगला विचार करू शकतात.त्यांच्या लेखन विकासासाठी त्यांना तशा प्रकारचे साहित्य वाचन मिळणे तसेच त्यांच्या लेखन कलेला अभिव्यक्त होण्यासाठी तशी संधी मिळणे आवश्यक असते.सृजन याचा अर्थ जे निर्माण केलेले आहे ते नवीन असे काही तरी होय.सध्या प्राथमिक स्तरावर ज्ञानरचनावादी शिक्षणपध्दती आलेली आहे तसेच त्यात लेखन कौशल्य विकसनासाठी गोष्ट लेखन आणि कविता लेखन हा भाग सुध्दा घेण्यात आलेला आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या लेखनाला प्राथमिक स्तरावर अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे.प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्याक्रमातंर्गत घेण्यात येणा-या चाचणीत यालाच स्वलेखन असे म्हटलेले आहे.

कथा लेखन करणारी मुले, कविता करणारी मुले यांची विचार करण्याची पद्धती तसेच त्यांनी योजलेली उदाहरणे तसेच लेखनामध्ये आलेले त्यांचे अनुभव विश्व तसेच त्यांचे त्यातून होणारे मनोरंजन इत्यादी अनेक गोष्टी यामध्ये अभ्यासणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी उच्च प्राथमिक वयोगटातील

विद्यार्थ्यांच्या लेखनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.त्यांच्या भावना विचार अभिव्यक्त होण्यासाठी उपलब्ध परिस्थिती कशा प्रकारे त्यावर परिणाम करू शकते हे पाहणे उपयुक्त ठरू शकते.विद्यार्थ्यांच्या स्वलेखनाचा अभ्यासामुळे शिक्षकांना त्यातील उणिवा समजतील तसेच त्यावर उपाययोजना करता येईल.

1.2)समस्या विधान /शीर्षक

उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे मराठी विषयातील स्वलेखन कौशल्याचा अभ्यास

1.3)संशोधनाच्या कार्यात्मक व्याख्या

उच्च प्राथमिक स्तर:- मोफत व सक्तीचें शिक्षण अधिनियम 2009 नुसार शाळेचे विविध स्तर दिलेले आहेत त्यात प्राथमिक स्तर इयत्ता 1 ते 5 तसेच उच्च प्राथमिक स्तर 6 वी ते 8 वी साठी वर्गासाठी संबोधला जातो.

मराठी :मराठी हा विषय प्रथम भाष व्दितीय भाषा व तृतीय भाषा या तीन स्तरावर शिकवला जातो परभणी जिल्ह्यात बहुसंख्य शाळा ह्या मराठी माध्यमाच्या असून प्रथमभाषा म्हणून मराठी विषय येथे शिकवला जातो.

स्वलेखन :-प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या गुणवत्ता विकासाच्या कार्यक्रमात वर्षभरात तीन चाचण्याचे आयोजन केले जाते.सदरील चाचणीत भाषा विषयाच्या प्रश्नपत्रिकेत स्वलेखन या बाबत प्रश्न असतो तो नव्याने समावेशित केलले आहे.स्वलेखनामध्ये कथा कविता लेखन येते मराठी साहित्यामध्ये विविध लेखन प्रकार आढळतात त्यात कथा लेखन हा प्रकार आहे तसेच कथे मध्ये काही पात्रे आणि कथानक यांच्या मधून कथालेखक काही तरी संदेश देत असतो तर यमक जुळवून कविता लेखन करणे हा प्रकार ही त्यात आहे. .लेखन कौशल्यामध्ये सृजनात्मक लेखनाची सुरूवात प्राथमिक स्तरावर होते तर उच्च प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना स्वलेखन कौशल्य अवगत होते.

विषय :शालेय स्तरावर विविध विषय शिकविले जातात

कौशल्य : भाषा ही विविध कौशल्याव्दारे अवगत होते त्यात श्रवण ,भाषण, वाचन लेखन ही मूलभूत कौशल्ये आहेत त्यात लेखन कौशल्य हे अत्यंत महत्त्वाचे असून त्यातून अभिव्यक्ती होते ती दृश्य स्वरूपात वाचन करता येते.कौशल्य ही ज्ञान आकलन या नंतरचे महत्त्वाचे भाषा अभ्यासाचे उद्दिष्ट होय.

1.4) संशोधनाची गरज :- सध्या मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनियम 2009 या नुसार गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी ही शासनावर आलेली आहे.शासनाने त्याकरिता प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविला जात आहे.या कार्यक्रमात विविध चाचण्या आयोजित केल्या जातात त्या पायाभूत चाचणी तसेच संकलित चाचणी तसेच पुस्तकासह चाचणी इ.सदरील चाचण्यामध्ये विद्यार्थी स्वअभिव्यक्ती क्षेत्रात स्वलेखन हा मुद्दा अत्यंत महत्त्वपूर्ण असून या कौशल्यामध्ये विद्यार्थी अप्रगत असण्याचे प्रमाण अधिक आहे तसेच स्वअभिव्यक्ती लेखन कौशल्यातून प्रभावी होण्यासाठी विद्यार्थी स्वअभिव्यक्तीचा अभ्यास शिक्षकांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.याक्षेत्रात प्रगती करण्यासाठी तसेच विद्यार्थी अभिव्यक्तीला व्यक्त होण्यासाठी स्वलेखनाशिवाय दुसरा पर्याय नाही म्हणून स्वलेखन हा विषय संशोधनासाठी घेण्यात आला आहे.

यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी कोणत्या प्रकारचे साहित्य प्रकार निवडतात तसेच त्यांच्या लेखनाचे विषय कोणते आहेत त्यांच्या लेखनावर कशाकशाचा परिणाम होतो त्यांच्या लेखनात कोणत्या त्रुटी आहेत त्या दुर करण्यासाठी कोणते उपाय योजावे लारगतील त्यांची अभिव्यक्ती प्रभावी व्हावी या करिता काय करावे इ अभ्यास करणे गरजेचे आहे म्हणूनच प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आलेले आहे.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत चाचणी मध्ये स्वलेखन क्षेत्रावर अधिक भर दिलेला आहे त्यामुळे या क्षेत्रात संशोधन होणे गरजेचे आहे.विद्यार्थी स्वत: कविता करतात किंवा काही नावे दिली असता त्याचा आधार घेऊन कथा तयार करणे

इ.प्रकारचे स्वलेखन विद्यार्थ्यांनी करणे अपेक्षित असते.या स्वलेखनात राहणा-या उणिवा कोणत्या ? त्यामध्ये अधिक सुधारणा कशी होईल ?या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी या बाबत संशोधन होणे गरजेचे आहे

1.5) संशोधनाचे महत्त्व :-स्वलेखन अर्थात विद्यार्थी स्वत:चे विचार आपल्या स्वभाषेत लेखन करतो.त्यामुळे श्रवण भाषण वाचन लेखन या चार कौशल्यातील सर्वात वरची पायरी म्हणजे लेखन कौशल्य होय.तसेच विविध लेखन प्रकारापैकी अनुलेखन,श्रुतलेखन त्यातही सर्वोच्य पातळी म्हणजे स्वलेखन होय.स्वलेखन ही सर्वात उच्च क्षमता असल्यामुळे त्यासाठी त्या पूर्वीचे सर्व टप्पे पूर्ण करावे लागतात.वाचनातून स्वविचारांना आकार मिळत असतो.तसेच स्वत:चे अनुभवविश्व तसेच स्वत:ची ज्ञानकक्षा ही देखील लेखनावर परिणाम करत असते.स्वलेखन खरं तर व्यक्तीपरत्वे भिन्न स्वरूपाचे असू शकते परंतु त्या लेखनातही मांडणी ,शैली ,ज्ञान,निवडलेला साहित्यप्रकार ,त्या साहित्य प्रकाराबाबतचे ज्ञान इत्यादी अभ्यासणे त्यामुळे लेखन कौशल्य कितपत विकसित झाले आहे.स्वअभिव्यक्ती प्रभावी तसेच इतरांना समजणारी आहे का ? त्यात नाविण्यापूर्णता आहे का ? स्वलेखन कौशल्य विकसित व्हावे यासाठी शिक्षक म्हणून वर्गात कोणत्या प्रकारची वातावरण निर्मिती जाणीवपूर्वक करणे गरजेचे आहे.या सा-या बाबीचा अभ्यास या प्रस्तुत संशोधनातून होणार आहे त्यामुळे विद्यार्थी स्वलेखन कशा प्रकारे करतो त्याची प्रगती कशी होत जाते तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्याक्रमातर्गंत चाचणीमध्ये विद्यार्थ्यांनी केलेले लेखन यामुळे अभ्यासपूर्ण रित्या पाहता येईल.जे विद्यार्थी स्वलेखनात मागे आहेत तसेच त्यांनी स्वलेखन कसे विकसित केले आहे याचे ही मार्गदर्शन या अभ्यासातून मिळेल त्यामुळे हा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे.

स्वलेखन प्रश्न उदाहरण

दिलेल्या शब्दांचा उपयोग करून एक गोष्ट तयार करा

नदी ,मुलगा,बाटली ,म्हातारा

रामापूर नावाचे एक छोटेसे गाव होते.गावाच्या जवळून एक नदी वाहत होती .नदीच्या काठावर सतत मुले खेळत असायची लांबच लांब पसरलेल्या वाळूवर मुलांना खेळण्यासाठी खूप मजा वाटायची.नदीवर एक मोठा पूल होता पुलावरुन सतत वाहनांची ये-जा चालू असायची.

ते दिवस उन्हाळयाचे होते त्यामुळे रस्ता आज शांत शांत होता .एखादे-दुसरे वाहन अधून मधून जात होते.एक म्हातारे आजोबा रस्त्यावरून पुढे निघाले होते.मुले रस्त्यावरून पळत -खेळत जात होती.म्हाता-या आजोबाची नजर खूप कमी झालेली होती त्यात उन्हाचा पारा वाढलेला होता त्यामुळे म्हातारे आजोबांना चालणे अवघड जात होते परंतु एक औषध आण्यासाठी त्यांना त्याच रस्त्यावाुन जाणे आवश्यक होते.म्हातारे आजोबा चालत असतांना अचानक समोरून वेगाने एक व्हॅन आली .आजोबांना काही कळायच्या आत ती व्हॅन धक्का देऊन गेली.आजोबांना घेरी आली ते खाली पडले जवळ आसपास कोणीही नव्हते.रस्त्याने जाणा-या मुलांने आजोबांना पाहिले आणि तो मूलगा धावतच आला त्याने आजोबा पडलेले पाहिले त्यांना उठवून बसवण्याचा प्रयत्न केला.दुसरी काही मुले धावत आली त्यांनी आजोबांना सावलीला नेले.बाटलीमधून नदीचे पाणी आणले आणि आजोबांच्या पायाला जखम झाली होती रक्त निघत होते.त्या ठिकाणी ती जखम पाण्याने धूतली आणि त्यांना पाणी पाजले तंव्हा आजोबांना थोडे बरे वाटले.मुलांनी सांगितले आजोबा तुम्ही जे औषध आणायला चालला आहात ते आम्हाला सांगा आम्ही मदत करतो तुम्ही जाऊ नका तुम्ही इथेच बसा असे म्हणून मुलांनी आजोबांची मदत केली.

1.6)संशोधनाची उद्दिष्टे :-

1) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या स्वलेखन कौशल्य सद्यस्थितीचा आढावा घेणे.

2) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या स्वलेखनात असणा-या उणिवांचा अभ्यास करणे.

3) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये स्वलेखन कौशल्य रूजविण्यासाठी शिक्षकांना येणा-या समस्यांचा अभ्यास करणे

4) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या स्वलेखनाचे विश्लेषण करून साहित्य प्रकारानुसार मांडणी करणे.
5) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा स्वलेखन कौशल्यावर परिणाम करणारे घटक यांचा अभ्यास करणे

1.7) संशोधनाची परिकल्पना :-

उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे स्वलेखनाच्या अभ्यासाने त्यातील उणिवा कमी होऊन विद्यार्थ्यांच्या स्वलेखनात प्रगती होते

1.8)संशोधनाची गृहितके :-

1) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या प्रथमभाषा मराठी विषयासाठी स्वलेखन कौशल्य विकसनामध्ये विद्यार्थ्यांना आडचणी आहेत.
2) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या प्रथमभाषा मराठी विषयासाठी स्वलेखन कौशल्य रुजविण्यासाठी शिक्षकांना आडचणी आहेत.
3) विद्यार्थ्यांनी केलेल्या स्वलेखनात वैशिष्टयपूर्ण घटक येत असतात.
4) विद्यार्थ्यांच्या स्वलेखनावर विद्यार्थ्याला असलेले ज्ञान,अनुभव विश्व,विचारकरण्याची पध्दती याचा परिणाम होतो.
5) विद्यार्थ्यांनी केलेले स्वलेखन अभ्यासातून प्रभावी स्वलेखन व कौशल्य विकसन कोणकोणत्या टप्प्यामधून होते हे लक्षात येते.
6) विद्यार्थ्यांच्या स्वलेखनातील उणिवा दूर झाल्या तर स्वलेखन चांगल्या प्रकारे करू शकतो.

1.9)संशोधनाची व्याप्ती :-

संशोधनाचे कार्य ज्या हेतूने पूर्ण केले जाते तो हेतू सफल होण्यासाठी व त्यांचा लाभ अधिक घटकांना होण्यासाठी त्यांची व्याप्ती निश्चित करावी लागते.संशोधन कोणत्या भौगोलिक क्षेत्राशी संबधित आहे ,त्यातील कोणत्या लोकांशी संबधित आहे ?त्याचा कोणकोणत्या घटकाशी संबध आहे.कोणत्या कालखंडाशी संबधित आहे.या संशोधनाचे निष्कर्ष कोणासाठी लागू पडतील ? याची अचूक माहिती आपणास व्याप्ती निश्चिती वरून समजतें.

क्षेत्र व्याप्ती :-प्रस्तुत संशोंधनात परभणी जिल्हयातील सर्व नऊ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

आशय व्याप्ती :-प्रस्तुत संशोधन हे इयत्ता सहावी ते आठवी वर्गातील मराठी प्रथम भाषा विषयाच्या स्वलेखन प्रश्नापुरते मर्यादित आहे.

घटक व्याप्ती :-प्रस्तुत संशोधनमध्ये इयत्ता सहावी ते आठवी वर्गातील मराठी प्रथम भाषा विषय शिकणा-या विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आला आहे.

1.10) संशोधनाच्या मर्यादा :-

1)प्रस्तुत संशोधन हे परभणी जिल्हयाती जिल्हा परिषदेच्या शाळेतील इयत्ता 6 वी ते 8 वी वर्गाच्या पुरते मर्यादित आहे.

2) प्रस्तुत संशाधन हे स्वलेखन म्हणजेच कथा व कविता या पुरते मर्यादित आहे.

1.11) संशोधनाची कार्यपध्दती

संशोधन म्हणजे काय ?

संशोधन ही समस्या निराकरणाची सुव्यवस्थित प्रक्रिया आहे.मानवी मनाला अस्वस्थ करणा या बहुविध समस्यांच्या प्रमाण व विश्वसनिय समाधानासाठी आवश्यक असलेल्या तथ्यांचे संकलन व विश्लेषण करून त्याला अन्वयार्थ लावण्याची व्यवस्थाबध्द प्रक्रिया म्हणजे संशोधन होय वेगवेगळया क्षेत्रामध्ये सातत्याने संशोधन चालू असते.उदा.उद्योग क्षेत्र,शिक्षण क्षेत्र,राजकारण,अर्थकारण.निरनिराळया क्षेत्राबरोबरच निरनिराळया काळातील ही संशोधन असते.भूतकाहातील वर्तमानकाळातील संशोधन असते.यातूनच भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न असतो.प्रत्येक संशोधनाचे उद्देश भिन्न भिन्न असतात.आणि त्या उद्देशानुसार संशोधन पध्दती ठरत असते.उद्देशाबररोबरच ज्या आशयाचे संशोधन करायचे असते.त्या आशयाचे स्वरूपही कोणती संशोधनपध्दती वापरायची हे ठरवित असते.म्हणजेच आधी पध्दती ठरविली मग त्या पध्दतीप्रमाणे संशोधन केलेअसे होत नाही तर ज्या क्षेत्रात संशोधन करायचे आहे ते क्षेत्र त्यातील आशय त्याचे उद्देश लक्षात घेऊन अनुरुप अशी संशोधन पध्दती निवडली जाते.हा आशय काहीवेळा अतिशय सैध्दान्तिक असतो तर काही वेळा तात्पुरत्या निर्माण झालेल्या समस्येच्या सोडवणुकीसाठी तो आशय अतिशय व्यवहारिक असतो.म्हणजे सैध्दन्तिक आश्य आणि उद्देश असतील तर तिथे प्रायोगिक पध्दती ,सर्वेक्षण पध्दती उपयोगी पडतेमात्र तथ्यात्मक आशयाला,घटनांच्या संशोधनाला ऐतिहासिक पध्दती ,व्यक्तिअभ्यास पध्दती उपयोगी असते.आपल्या रोजच्या व्यवहारातील समस्या संशोधन मार्गाने सोडविण्यासाठी संशोधन पध्दतींचा वापर केला जातो

संशोधनाची उद्दीष्टे ,माहिती संकलनाचे तंत्र ,नियंत्रण तंत्र ,साधने , क्षेत्र इ.अनेक प्रकारच्या आधारावर शेक्षणिक संशोधन पध्दतीने वर्गीकरण करण्यात येते संशोधन पध्दतीचे खालील तीन गटात वर्गीकरण केले जाते.

1)ऐतिहासिक संशोधन

2) सर्वेक्षण पध्दती

3)प्रायोगिक संशोधन

1) ऐतिहासिक संशोधन :- भूतकालीन घटनांचे वर्णन आणि पृथ:करण करण्याकरिता शास्त्रीय पध्दतीने उपयोजन म्हणजे ऐतिहासिक संशोधन होय.

ऐतिहासिक संशोधनामध्ये भूतकालिन घटनांचे संकलन ,वर्णन ,स्पष्टीकरण ,मूल्यांकन केले जाते.वर्तमान समस्याच्या निराकरणार्थ भूतकालिन घटनांचा आधार घेतला जातो.तसेच वर्तमान घटनांचा अर्थ संमजून घेण्याकरिता व भविष्याचा अंदाज करण्याकरिता या संशोधन पध्दतीचा अवलंब केला जातो.शिक्षणातील विविध समस्याची उकल करण्यासाठी त्याची पार्श्वभूमी स्पष्ट होण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक संशोधन महत्त्वाचे आहे.इतिहासाच्या अध्ययनाने संस्कृतीची वैशिष्ट्ये समाजरचना,शिक्षण पध्दती त्यातील गुणदोषाचा समाजावर णालेला परिणाम इ बाबी समजतात.व त्यामुळे वर्तमान शिक्षणावर यथार्थ विचार करता येतो.

2) सर्वेक्षण पध्दती /वर्णनात्मक पध्दती

व्यवहारात सर्वात प्रचलीत असलेली ही संशोधन पध्दती असून मराठी विश्वकोषानुसार 1961 सामाजिक ,आर्थिक ,वैज्ञानिक किंवा इतर क्षेत्रतील विविध समस्याच्या अभ्यासाकरिता सर्वेक्षण करून आकडेवारी व माहिती विशिष्ट तत्त्वानुसार प्रातिनिधिक नमुन्याच्या स्वरुपात म्हणजेच प्रतिदर्शाच्या स्वरूपात गोळा करण्याच्या व तिचे विश्लेषण करुन त्यावर अनुमान व निष्कर्ष काढण्याच्या पध्दतीला प्रतिदर्श सर्वेक्षण म्हणतात.

सर्वेक्षणात व्यक्तिचा स्वतंत्र अभ्यास केला जात नाही .त्या गटाच्या किंवा जनसंख्येच्या वैशिष्टयांचा एकत्रित पणे विचार केला जातो.

वर्झनात्मक संशोधनाच्या आधासरे पुढील प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतात.

1)संबधित शैक्षणिक समस्येबाबत आजची परिस्थिती काय आहे.?

2)निश्चित आडचणी व त्रुटी उणिवा कोणत्या आहेत.

3) मिळालेल्या माहितीच्या आधारे विविध तज्ञांची मते घेऊन व संशोधकाने स्वत:चे ज्ञान व अनुभव विचारात घेऊन या समस्येवर कोणता उपाय शोधला ?

सर्वेक्षण पध्दतीत माहिती संकलित केली जाते.तसेच त्यात प्रयोगशीलता व त्यातून आनुमान काढण्याची प्रवृत्ती ही आढळते.सर्वेक्षण म्हणजे प्रचलित तथ्यांचे संकलन वर्णन स्पष्टीकरण आणि मूल्यांकन होय .

वैशिष्ट्ये :-

1)मूलभूत स्वरूपाची माहिती जमा केली जाते.

2)आवश्यक माहिती प्रश्नावली व कसोट्यासारख्या साधनाने जमा केल जाते.

3)त्या माहितीचे योग्य पध्दतीने सारणीकरण करून त्यातून सखोल संशोधनासाठी अर्थनिचर्वचन केले जाते.

3.)प्रायोगिक पध्दती

प्रायोगिक पध्दती ही एक वैज्ञानिक पध्दती असून शैक्षणिक संशोधनात तिचा वापर केला जातो.इतर सर्व घटकांना नियंत्रित करून फक्त एका घटकाच्या उपयोगाने कोणता बदल घडून येतो हे पाहण्याकरिता केलेला प्रयोग हे प्रायोगिक पध्दतीचे वैशिष्ट्य आहे .अचूक निरिक्षण निरीक्षणाच्या नोंदी नियंत्रित परिस्थिती स्थिर ठेऊन केलेले निरीक्षण असून कार्याकारण संबध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने बदलांचा अभ्यास यात अपेक्षित असतो.वरील संशोधन पध्दतीतील वर्णनात्मक संशोधन पध्दती अर्थात सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर प्रस्तुत संशोधनासाठी संशाधकाने केलेला आहे.

1.12)संशोधनाची साधने - प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी प्रमाणित कसोटयांचा वापर करण्यात येणार आहे

१) सर्जनशीलता : इ पॉल टोरॉन्स यांची गंमतजंमत शब्दासंगत अर्थात शब्दांकित प्रति मान (thinking creativity with words test)

२)अध्यापन कौशल्य :समान्य अध्ययन कसोटी डॉ श्री के पासी आणि मिसेस एम.एस.ललिता यांची सामान्य अध्ययन कसोटी (general teaching competency with words test)

३) डॉ एम.बी.शाह यांची माध्यमिक शिक्षकांकरिता अभियोगयता कसोटी (secondary teacher aptitude test)

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दती निवडण्यामागील भूमिका

१) प्रस्तुत संशोधनात परभणी जिल्ह्यातील उच्च प्राथमिक सतरावरील विद्यार्थ्यांचे स्वलेखनाचे सर्वेक्षण करून सद्यस्थितीचा आढावा घ्यावयाचा आहे.जेव्हा संशोधन समस्ये संबधीची मूलभूत स्वरूपाची सद्यकालिन सामुग्री जमा करावयाची असते तेव्हा सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केला जातो.

२) जन प्रवाहाची प्रवृत्ती घेणे हा संशोंधनाचा प्रमुख हेतू आहे.त्यामुळे या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात येईल .

3) प्रस्तुत संशोधना मध्ये विद्यार्थ्यांचे स्वलेखन सद्यस्थितीचा शोध घ्यावयाचा आहे.शिक्षकांना हे कौशल्य विद्याथ्यांमध्ये   रुजविण्यासाठी काही समस्या आहेत का ? हे पाहण्यासाठी सर्वेक्षणासारखे दुसरी उपयुक्त पध्दती नाही

4) स्थानिक परिस्थिती ,प्रश्नावली,पडताळा सूची ,यासाधनाव्दारे समजून घेता येते.त्यामुळे या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केला जातो.

प्रकरण दुसरे

संबधित साहित्याचा व पूर्वसंशोधनाचा आढावा

२.१ प्रस्तावना

२.२ संबधित पूर्वसंशेधनाचा आढावा

२.३ संबधित संशोधन साहित्य

2.1 प्रस्तावना :-

प्रस्तुत संशोधन कार्यापूर्वी संबधित साहित्याचा आढावा घेणे आवश्यक असते.कारण संशोधकाला यापूर्वी संबधित विषयावर कोणकोणते संशोधन झाले व यातून कोणकोणते निष्कर्ष निघाले इत्यादीचे ज्ञान होते

संबधित संशोधन साहित्यामध्ये सर्वच पुस्तके ज्ञानकोष पत्रिका प्रकाषित व अप्रकाषित शोध प्रबंध व अभिलेख इ. येतात.जे संशोधनाकरिता समस्या निवडीपासून परिकल्पना मांडणी व अध्ययनाची कार्यपध्दती निर्धारित करण्यासाठी उपयोगी ठरतात.

उच्च प्राथमिक स्तरावरील मराठी विषयातील विद्यार्थ्यांचे स्वलेखन कौशल्य विकसन एक अभ्यास

या प्रस्तूत संशोधनाकरिता विविध शैक्षणिक व मराठी भाषा विषयक विचार तसेच या विषयाबाबत या पूर्वी झालेले संशोधन यांचा आढावा घेण्यात येईल

2.2 संबधित पूर्व संशोधनाचा आढावा:-

प्रस्तुत संशोधन हे स्वलेखनाबाबत असल्यामुळे स्वलेखन विकसन करण्याबाबत तसेच सृजनात्मक लेखन इ. लेखन प्रकारांच्या विविध संशोधकानी केलेल्या संशोधना आढावा घेऊन प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण स्पष्ट केले जाईल.

१)शीर्षक :-उस्मानाबाद जिल्ह्यातील माध्यमिक शाळामधील मराठी भाषेच्या अध्यापनाच्या सद्यस्थितीचा व समस्यांचा चिकीत्सक अभ्यास

संशोधक :-सुधाकर माधवराव गंधे विजय हायस्कूल भूम जि.उस्मानाबाद

उद्दिष्टे :-संशोधकाने मराठी विषयातील भाषेच्या अध्यापनाच्या सद्यास्थितीचा अभ्यास केलेला आहे.

1) उस्मानाबाद जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील मराठी विषय सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने भाषेचे महत्त्व समजमन घेणे.
2) उस्मानाबाद जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील मराठी विषय भाष विषय मागासलेपणाची कारणे शोधणे.
3) उस्मानाबाद जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील मराठी विषय अध्यापनाच्या शिक्षकांना येणा-या आडचणी समजून घेणे.
4) विद्यार्थ्यांच्या भाषेचा स्तर सुधारण्यासाठी विविध साधने सुचविणे.

संशोधन पध्दती :-प्रस्तूत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला होता.प्रश्नावली ,मुलाखत निरिक्षण इत्यांदी साधनांचा उपयोग करण्यात आला होता.१६३ विभागातील १००० भाषा शिक्षकांना प्रश्नावली पाठविण्यात आलेल्या होत्या.त्यापे्की ८२० शिक्षकांनी प्रतिसाद दिला होता.५०० शिक्षकांच्या मुलाखती आणि १५० शिक्षकांच्या पाठांचे निरिक्षण करण्यात आलेले होते.या सर्व माहितीचे संकलन करून अन्वयार्थ लावण्यात आले.

निष्कर्ष :-

१) उस्मानाबाद जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील मराठी विषय अध्यापनाच्या सद्यस्थिती ही विविध स्वरूपाची असून दर्जा स्पष्टीकरण व शब्दांचे अर्थ यामध्ये 66% शिक्षकांना आडचणी आल्या .

२) काव्य शिकवितांना ६०%शिक्षकांना कठीण वाटते. त्यातील १० % शिक्षकांना कवितेचा सारांश व शब्दार्थ कढीण वाटतात.

३) ८५ %शिक्षकांना व्याकरण शिकवितांन वेळेची कमतरता जाणवते.

४) निबंध लेखनास वेळ कमी मिळतो असा ६५ % शिक्षकांचा प्रतिसाद होता.त्यात विषयज्ञान योग्य अभिव्यक्ती वाक्यरचना याबाबतीत आडचणी येंतात.

५) भाषांतर पध्दततीवर ५०% पेक्षा अधिक शिक्षकांचा भर होता.

सारांश :-प्रस्तुत सर्व संशोधनाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की सर्व संशोधकांनी भाषा विषयक स्वलेखन तसेच मराठी भाषा अध्यापन याचा विचार संशोधनामध्ये केलेला आहे.परंतु त्यांच्या उद्दिष्टामध्ये विविधता आढळते.त्याचा ही विचार संशोधनात केलेला आहे.भाषा विषयातील स्वलेखन अभ्यासण्याच्या दृष्टीनेप्रस्तुत संशोधनाची माहिती अत्यंत महत्त्वाची आहे. आहे.अनेक संशोधकानी संशोधनातून निष्कर्ष मांडलेले आहेत की प्रत्येक विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती ही वेगवेंगळी असून त्याच्या विचार अनुभव ,ज्ञानकक्षा याचा त्याच्या लेखनावर पकरणाम होतो.मूल स्वलेखन कशा प्रकारे करू शकते.त्याच्या स्वलेखनामध्ये कोणत्या उणिवा आहेत तसेच

शिक्षकांना स्वलेखन कौशल्या विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी आडचणी येतात हे दिसून येते. मातृभाषा मराठी अध्यापन याबाबत बरीच संशोधने यापूर्वी झालेली आहेत याचा आढावा प्रस्तुत स्ंशोंधनासाठी घेण्यात आलेला आहे.

२)शीर्षक : सर्जनशीलता व अध्यापन कौशल्य संदर्भात विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास

संशोधक :-गौतम ज्ञा.लोंढे पुणें विद्यापीठ

उद्दिष्टे :-संशोधकाने अध्यापन कौशल्य व सर्जनशीलता संदर्भात विद्यार्थी शिक्षकांच्या अभियोग्यतेच्या सद्यास्थितीचा अभ्यास केलेला आहे.

१)विद्यार्थी शिक्षकांच्या सर्जनशीलतेचा अभ्यास करणे

२) विद्यार्थी शिक्षकांत अध्यापन कौशल्याचा अभ्यास करणे

३) विद्यार्थी शिक्षकांत अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे

४) विद्यार्थी शिक्षकांत अध्यापन कौशल्य व सर्जनशीलता यांच्या सहसंबधाचा अभ्यास करणे

६) विद्यार्थी शिक्षकांत अध्यापन अभियोग्यता व सर्जनशीलता यांच्या सहसंबधाचा अभ्यास करणे

७) विद्यार्थी शिक्षकांत अध्यापन कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यांच्या सहसंबधाचा अभ्यास करणे

संशोधनपध्दती :

प्रस्तुत संशोधनात सर्जनशीलता व अध्यापन कौशल्य व विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास केलेला आहे.त्या करिता अभ्यासाकरिता ५०० विद्यार्थी शिक्षक घ्यावयाचे होते.पुणे विद्यापिठांशी संलग्न असणा-या एकूण १४ शिक्षणशास्त्र महाविद्यालयापैकी सात महाविद्यालयाची संशोधन अभ्यासासाठी निवड करावयाची होती.

प्रस्तुत चौदा शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना संशोधन अभ्यासाकरिता अनुमती देण्यासंबधी विनंती पत्रे पाठविण्यात आली.चौदा शिक्षणशास्त्र महाविद्यालयापैकी नऊ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अनुमती देऊन सहकार्य केले काही महाविद्यालयाच्या पूर्वनियोजित कार्याक्रमात अनपेक्षित बदल झ ााल्यामुळे नियोजित वेळी काही महाविद्यालये उपलब्ध होऊ शकली नाही .

काही महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठासाठी दूरच्या शाळेत जायचे होते त्यामुळे सामायिक कसोटया सोडविणा-या विद्यार्थी शिक्षकांची संख्या कमी झाली

एकदोन महाविद्यालयात प्राध्यापकांना देण्यासाठी सामान्य अध्यापन सामर्थ्य मापिका (GTCS) प्राचार्यांनी ज्या प्राध्यापकावर सोपवली होती. त्यांनी ती उशिरा प्राध्यापकाकडे दिल्यामुळे विद्यार्थी शिक्षकांची संख्या कमी झाली.

तसेच ब-याच प्राध्यापकांनी सामान्य अध्यापन सामर्थ्य मापिका परत न केल्यामुळे ,काहीनी कमी विद्यार्थी शिक्षकांच्या सामान्य अध्यापन सामर्थ्य मापिका पाठविल्यामुळे, ,एकाच विद्यार्थी शिक्षकांच्या एकापेक्षा जास्त मापिका पाठविल्यामुळे सामान्य अध्यापन सामर्थ्य मापिका कमी मिळाल्या.

गमंत जंमत शब्दासंगत अर्थात शब्दांकित प्रतिभा (thinking creativity with word test) सामान्य अध्यापन सामर्थ्य मापिका (general teaching competency scale) आणि शिक्षकांकरिता अभियोग्यता कसोटी (secondary teacher aptitude test) अशी तीन कसोटयां भरून दिलेल्या विद्यार्थी शिक्षकांची संख्या ५८९ एवढी होती.

काही महावद्यिालयात कसोटया भरून घेण्यासाठी तीनपेक्षा जास्त वेळा जावे लागले म्हणून सात ऐवजी नऊ माहाविद्यालयातून माहिती संकलन केले.

पुणे विद्यापीठ कार्याक्षेत्रात एकूण १४ शिक्षणशास्त्र महाविद्यालये आहेत. नाशिक जिल्ह्यात ३ पुणे जिल्ह्यात ७ नगर जिल्ह्यात ४ शिक्षणशास्त्र महाविद्यालये आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील किमान एक तरी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा प्रस्तुत संशोधनात समावेश करण्यात आला आहे.

निष्कर्ष

1)वर्गात 1/4 प्रमाणात शिक्षकांचे संभाषण होते व्याख्यान व प्रश्न अध्यापन पध्दतीचा योग्य प्रमाणात वापर केला जातो.

2) मुख्यत्त्वे भर वस्तुस्थितीवर होता

3)शिक्षकांचे मौखिक सर्जनशील विचार व व प्रतिमाव्दारा व्यक्त विचारामध्ये सहसंबंध होता.

4) जास्त सर्जनशील विचार असणा-या शिक्षकांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना स्तुती करून त्यांचे विचार लक्षात घेऊन किंवा त्यांना पूर्णवेळ नाकारून त्यांना वर्ग संभाषणात भाग घेण्यास उद्युक्त केले.

5) जास्त सर्जनशील विचार असणा-या शिक्षकांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना स्तुती करून त्यांचे विचार लक्षात घेऊन किंवा त्यांना पूर्णवेळ नाकारून त्यांना वर्ग संभाषणात भाग घेण्यास उद्युक्त केले.

निष्कर्ष :

१) पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेमध्ये यथर्थ फरक नसल्यामुळे पदवीधर आणि पदव्युत्तर दोन्हीही विद्यार्थी शिक्षकांची अभियोग्यता सारखीच आहे.प्रस्तुत सारणीक्र ४.१३ वरून असे अनुमान काढण्यात येते की

निष्कर्ष : सर्जनशीलता

१)स्त्री आणि पुरूष या दोन्ही गटातील विद्यार्थी शिक्षक सर्जनशील आहेत.

२)शहरी आणि ग्रमीण विद्यार्थी शिक्षकांच्या सर्जनशीलतेत फरक आढळतो याचा अर्थ ग्रामीण विद्यार्थी शिक्षकांपेक्षा शहरी विद्यार्थी शिक्षक अधिक सर्जनशील आहेत.

३) पदवीधर आणि पदव्युत्तर या दोन्ही गटातील विद्यार्थी शिक्षक स्त्री -पुरूष आहेत.

निष्कर्ष : अध्यापन कौशल्य

१) स्त्री आणि पुरूष या दोन्ही गटातील विद्यार्थी शिक्षकांचे अध्यापन कौशल्य सारखेच आहे.

२) पदवीधर आणि पदव्युत्तर या दोन्ही गटातील विद्यार्थी शिक्षक स्त्री -पुरुष यांचे अध्यापन कौशल्या सारखेच आहे.

निष्कर्ष : अध्यापन अभियोग्यता

१) स्त्री आणि पुरूष या दोन्ही गटातील विद्यार्थी शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता सारखीच आहे.
२) शहरी आणि ग्रमीण विद्यार्थी शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता सारखीच आहे.
३) पदवीधर आणि पदव्युत्तर या दोन्ही गटातील विद्यार्थी शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता सारखीच आहे.

सारांश :-प्रस्तुत सर्व संशोधनाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की सर्व संशोधकांनी भाषा विषयक स्वलेखन तसेच मराठी भाषा अध्यापन याचा विचार संशोधनामध्ये केलेला आहे.परंतु त्यांच्या उद्दिष्टामध्ये विविधता आढळते.त्याचा ही विचार संशोधनात केलेला आहे.भाषा विषयातील स्वलेखन अभ्यासण्याच्या दृष्टीनेप्रस्तुत संशोधनाची माहिती अत्यंत महत्त्वाची आहे. आहे.अनेक संशोधकानी संशोधनातून निष्कर्ष मांडलेले आहेत की प्रत्येक विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती ही वेगवेंगळी असून त्याच्या विचार अनुभव ,ज्ञानकक्षा याचा त्याच्या लेखनावर परिणाम होतो.मूल स्वलेखन कशा प्रकारे करू शकते.त्याच्या स्वलेखनामध्ये कोणत्या उणिवा आहेत तसेच शिक्षकांना स्वलेखन कौशल्या विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी आडचणी येतात हे दिसून येते. मातृभाषा मराठी अध्यापन याबाबत बरीच संशोधने यापूर्वी झालेली आहेत याचा आढावा प्रस्तुत स्ंशोंधनासाठी घेण्यात आलेला आहे.

प्रकरण चार : माहितीचे संकलन व विश्लेषण

संबधित संशोधन साहित्य :-

प्रस्तुत संशोधनासाठी विद्यार्थ्यांचे पायाभूत चाचणी तसेच संकलित मूल्यमापन चाचणी यामध्ये विद्यार्थ्यांनी केलेले स्वलेखन या साहित्याचा अभ्यास केला जाईल.

निष्कर्ष :-

सर्व प्रश्नावली तसेच पडताळा सूची अनुसार निष्कर्ष काढण्यात येईल.

शिफारशी

प्रस्तुत संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतील त्यानुसार व्यवहार्य व दिशादर्शक अशा प्रकारच्या शिफारशी करण्यात येतील.प्रत्येक निष्कर्षावर आधारित शिफारस असेल.

संदर्भ ग्रंथ सूची

आगलावे प्रदीप (2000) संशोधन पध्दती व तंत्रे विद्या प्रकाशन ,नागपूर

जगताप ह. ना. (1994) प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान ,नूतन प्रकाशन पूणे

भिताडे वि.रा.(2006) शैक्षणिक संशोधन पध्दती नूतन प्रकाशन पूणे

आफळे आ.रा. (1978) शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठाण श्री विद्या प्रकाशन पूणे

संशोधनाची पंधरा पुष्पे (ऑगस्ट 2003) संपादन समिती यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ,नाशिक

देशमुख एल. जी.(1999) शिक्षणाचे मानसशास्त्र फडके प्रकाशन कोल्हापूर

डॉ.जगताप ह. ना. (1980) शिक्षणाचे मानसशास्त्र फडके प्रकाशन कोल्हापूर

दांडेकर वा. ना. (1986)संख्याशास्त्रीय मूल्यमापन व साधने श्री विद्या प्रकाशन पूणे

कुंडले म.बा. अध्यापनशास्त्र आणि पध्दती व्हीनस प्रकाशन   शनिवार पेठ पूणे 30

कुंडले म.बा. शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र म वि ग्रंथनिर्मितीसाठी श्री विद्या प्रकाशन पूणे